मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर

दि.२६/०७/२०२१

विभाग- संरक्षण व सामरीक शास्त्र
प्रमुख वक्ते– प्रा. आर. व्ही.पवार
विषय –२६ जुलै कारगिल विजय दिन अहवाल

कारगिल युद्धातील जवानांच्या शौर्याला सलाम व स्मरणकरण्यासाठी आणि आजच्या सैनिकांना ऊर्जा मिळण्यासाठी 26 जुलाई कारगील विजय दिन म्हणून साजरा केला जातो यात प्रत्येक भारतीयाने देखील सहभागी होऊन देशप्रेम, राष्ट्रीय एकता निर्माण करण्यासाठी हा दिन साजरा करावा असे प्रतिपादन संरक्षणशास्त्र विभागप्रमुख प्रा.आर. व्ही.पवार यांनी सिन्नर महाविद्यालयात आयोजित केलेल्या कारगील विजय दिन प्रसंगी केले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते प्रा. आर. व्ही.पवार यांनी आपल्या मनोगतात कारगिल युद्धाची पूर्ण शौर्य गाथा सांगितली त्यामध्ये भारताने पाकिस्तानला हरवून 26 जुलै 1999 रोजी कारगिल युद्ध जिंकले या गोष्टीला आज बावीस वर्ष होत आहे 26 जुलैला मिळाला होता तेव्हापासून हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो भारतीय सैन्य दलाने अतिशय खडतर परिस्थितीचा सामना करत कारगिल युद्ध जिंकले कारगिल युद्ध क्षेत्र हे जगातील सर्वोच्च आणि खतरनाक युद्ध क्षेत्रापैकी एक आहे हे युद्ध श्रीनगर पासून 205 किलोमीटर दूर कारगिलच्या द्रास टायगर हिल क्षेत्रात लढले गेले या ठिकाणी तापमान 40 डिग्री मायनसच्या आसपास असते आणि पाकिस्तानला याच क्षेत्रापासून काश्मिर पर्यंत तसेच सियाचीनवर कब्जा करायचा होता.

कारगिल युद्ध क्षेत्र हे समुद्र सपाटी पासून अतिशय उंच असल्या कारणाने तेथे सैन्य आणि शस्त्रसाठा घेऊन जाणे भारतीयांसाठी अतिशय मुश्किल होते पाकिस्तानी सैनिकांनी सुरुवातीला लाईन ऑफ कंट्रोल उल्लंघन करून भारतीय क्षेत्रात आपल्या चौक्या स्थापन केल्या ही बाब भारताच्या उशिरा निदर्शनास आली याची शहानिशाकरण्यासाठी भारतीय सैन्याने सैनिकांची एक तुकडी कारगिल भागात पाठवली त्यावेळी दोन्ही सैन्यांचा एकमेकावर गोळीबार सुरू झाला यात भारतीय सैन्याचे कॅप्टन सौरभ कालियायांच्या शरीराचे छिन्ह विछिन्न अवस्थेत व त्यांच्या सहकाऱ्यांचे मृतदेह भारतीय सीमेपलीकडे टाकले त्यानंतर भारतीय मिग-27 या विमानाने सर्चींग ऑपरेशन करताना भारतीय विमान क्रॅश झाले विमानाचा पायलट पाकिस्तानच्या हद्दीत जाऊन उतरले त्यांनी त्यास युद्ध बंदी केले त्यानंतर भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारतीय सैन्याला आदेश देऊन पाकिस्तानी सैन्याने अडकवलेल्या चौक्या परत मिळवण्यासाठी युद्ध सदृश्य परिस्थिती जाहीर केली आणि युद्धाला सुरुवात झाली भारतीय सैन्याने बोफोर्स तोफा जॉग्वर, मिरज -2000 MI-17 यांचा वापर करून द्रास मधील टायगर हिल तोलोलीन यासारख्या महत्त्वाच्या टेकड्या वरील महत्त्वाची ठिकाणे ताब्यात घेण्यासाठी प्राणाची आहोती देऊन संघर्ष केला हेयुद्ध दोन महिने तीन आठवडे दोन दिवस चालले या युद्धात भारताला इजराइल या देशाने ड्रोनची मदत केली होती या युद्धाला स्थलसेनेने ऑपरेशन विजय असे नाव दिले तर नोसेने ने ऑपरेशन तलवार वायुसेनेने ऑपरेशन सफेद सागर असे नाव दिले होते राष्ट्रीय महामार्ग श्रीनगर ते लेह या रस्त्यावर कारगील वसलेले आहे कारगीलचे युद्ध होण्याचे प्रमुख कारण हाच रस्ता आहे.

हे युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे अति उत्कृष्ट उदाहरण आहे यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्य बळने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्र सज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते त्यामुळे सर्व जगाचे लक्ष यायुद्धाकडे लागल होते परंतु भारताने हे युद्ध कारगिल पुरतेच मर्यादित ठेवले त्यामुळे दाखवलेल्या प्रेमाबद्दल भारताचे जगभर कौतुक झाले म्हणूनच भारताला आंतरराष्ट्रीयस्तरावर पाठिंबा मिळाला याउलट सैन्यमागे घ्यावी यासाठी पाकिस्तानवर अमेरिकेसह अनेक देशांनी

दबाव आणला होता या युद्धानंतर भारताने आपल्या संरक्षण खर्चात अनेक पटीने वाढ केली तर पाकिस्तानात राजकीय अस्थिरता माजली होती.

कारगिल युद्ध हे भारतीय माध्यमांसाठी एक मैलाचा दगड ठरले कारगिलच्या युद्धाच्या वेळेस भारतीय प्रसारमाध्यमांनी जागतिकीकरणात उडी घेतली होती आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वाहिन्यांच्या दर्जा गाठण्या ससुरुवात केली होती कारगील युद्धाच्या निमित्ताने यावाहिन्यांनी युद्धाचा जास्तीत जास्त बातम्या सादर करण्यात पुढाकार घेतला भारतीय सैन्याने ही यात मागे न राहता माध्यमांचा वापर काळजीपूर्वक व आपल्या सोयीकरता करून घेतला त्यामुळे युद्धाबाबत भारतीय सैन्याला सहानुभूती मिळवण्याचा सोपे गेले तसेच युद्ध दृश्यवत्यांच्याय शाला योग्य विश्लेषण यामुळे भारतीयांमध्ये ऐक्याची भावनावाढीस लागली जसजसे युद्ध पुढे सरकत गेले तसेतसे माध्यमांनी प्रक्षेपण अजून वाढवली प्रक्षेपणाची व व्याप्ती भारतात पाकिस्तान पेक्षा खूप जास्त होती काही वाहिन्यांनी सरळ-सरळ युद्ध क्षेत्रात जाऊन युद्धाचे थेट प्रक्षेपण केले भारतीय सैन्यांच्या तोफांचा मारा काही खास करून दाखवला गेलायामुळे भारतीय जन मानसातील एकता निर्माण होण्यास मदत झाली.